# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 2964/शि.वि./2016
दि. 01/10/2016

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व माध्यमिक शाळा
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :– इयत्ता 9 व 10 वी च्या सहशालेय (श्रेणी) विषयाचे पूनःरचना करण्याबाबत सर्वेक्षण.**

**संदर्भ :–** संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पूणेम.रा.शै.स. व प्र. परिषद/3144/2016–17 दि.26.09.2016 चे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, प्रत्येक विद्यार्थ्यांना वयोगटानुरूप अपेक्षित क्षमता प्राप्त करावे या उद्देशाने महाराष्ट्र शासन प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबवित आहे. प्रत्येक मुल जबाबदार नागरीक बनविण्यासाठी, स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे राहू शकण्यासाठी तसेच इतरा प्रती त्याच्या मनात चांगूलपणा निर्माण व्हावा यासाठी समग्र शिक्षणाची आवश्यकता आहे. यासाठी http://www.research.net/r/gradesubject या लिंकवरून महाराष्ट्र शासन सहशालेय (श्रेणी) विषयाच्या सध्याच्या अध्यापन व मूल्यमापन पध्दतीमध्ये सुधारणा करता येईल का याची शक्यता पडताळून पाहत आहे. यासाठी विविध स्तरातून मिळणारी माहिती योग्य निर्णय घेण्याच्या दृष्टीने खूप मोलाची ठरणार आहे याकरीता आपल्या शाळेतील मु.अ., सर्व शिक्षक, सर्व विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक व परिसरातील नागरीक यांनी या लिंकवर जावून अभ्यासक्रम वाचून त्यावर आपले अमुल्य अभिमत द्यावयाचे आहे. सदर लिंक ही दि.05.10.2016 ला सूरू होणार असून या लिंकवर आपण सर्वांनी आपले अभिमत नोंदवावे. तसेच आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक व परिसरातील सूजान नागरीक यांना या लिंकवर आपले अभिमत नोदंविण्याबाबत सूचना द्याव्या.

(फारूक अहमद खान)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) मा.उपायुक्त, म.न.पा.नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
2)सहा. शिक्षणाधिकारी, म.न.पा.नागपूर यांना माहितीस्तव सादर.
3)शाळा निरीक्षक झोन क्र 1 ते 10, म.न.पा.नागपूर यांना कार्यवाहीस्तव